काव्य



REFBK-0016289
REFBK-0016289

# प्रसाद रामायण

वि. म. कुलकर्णी

# प्रसाद रामायण

१९९०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
क्रमांक ...८४३८९... विषय ...काव्य...
...१९९० ... ११।३।७१

**वि. म. कुलकर्णी**

REFBK-0016289
REFBK-0016289

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

किंमत : २ रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. १६२८९

गो. य. राणे प्रकाशन, पुणे ९.

प्रकाशक :
गो. य. राणे
टिळक रोड,
पुणे ९.

*

मुखपृष्ठ व आतील सजावट
श्री. प्रताप मुळीक.

*

© वि. म. कुलकर्णी

*

'प्रसाद–रामायणा' चे कार्यक्रम
श्री. वि. म. कुलकर्णी,
शारदासदन, नवी पेठ
सोलापूर —
यांच्या लेखी परवानगीशिवाय
करू नयेत.

*

मुद्रक :
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस, प्रा. लि.,
३८३ नारायण पेठ, पुणे २.

पुण्यपावन रामकथा
रचणाऱ्या
आदिकवी वाल्मीकींच्या
चरणी समर्पण . . .

## ‘प्रसादा’ची
## स फ ल ता

श्री. वि. म. कुलकर्णी हे मराठीतील एक नामवंत कवी आहेत. मानापमान नाटकातील वनमालेप्रमाणे त्यांच्या कवितेतून सहजतेचे आणि संस्कृतीचे सौंदर्य रसिकांपर्यंत पोचते झाले आहे. अशा कवितेला रामायणातील रसोत्कट आणि माणसाच्या मनाला अपार्थिव प्रकाश देणाऱ्या कथासूत्राने आकर्षित करावे हे केवळ स्वाभाविक आहे. रामायण–महाभारतासारखी लोकजीवनात रुजलेली महाकाव्ये खरोखर वाङ्मयीन वृत्तीच्या मर्यादेमध्ये सामावत नाहीत. त्या उंबरठ्याचे उल्लंघन करून ती सत्यसृष्टीत प्रवेश करतात आणि लोकांच्या मनात ‘एक अलौकिक वास्तव’ म्हणून वास्तव्य करू लागतात. म्हणूनच कवींच्या प्रतिभांना अशी काव्ये पुनः पुन्हा आमंत्रित करतात. त्यातील घटनांचे आणि जीवनांचे नवेनवे आविष्कार शोधण्यात कवींना एक आव्हान मिळाल्यासारखे वाटते. रामायणाच्या रत्नागारातून अनेक कवींनी आपल्याला रुचतील ती रत्ने वेचली आहेत आणि आपल्या भावकल्पनांचे कोंदण घालून त्यांना नवे रूप दिले आहे. परंतु वर लिहिलेल्या कारणामुळे रामायण कधी शिळे होत नाही अथवा त्याचे आवाहन बोथट होत नाही.

श्री. वि. म. कुलकर्णी हे अनुभवसंपन्न कवी असल्यामुळे रामायणातील विविध घटनांभोवती त्यांनी केलेली शब्दांची व कल्पनांची कलाकुसर मनोवेधक असावी यात नवल नाही. परंतु या ‘प्रसादा’तील अधिक महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांची हार्दिकता हा होय. या घटनांशी कवी आपल्या भावनेने अत्यंत समरस झाले असल्यामुळे त्यातील उत्कटतेचे अनुभव वाचकापर्यंतही पोचल्याशिवाय राहात नाहीत. काव्यरचनेपेक्षा कवीला रामायणासंबंधी वाटणाऱ्या प्रेमाचा आणि भक्तीचाच हा खरोखर एक आविष्कार आहे. ही भावना वाचकाला ‘आपली’ वाटणे हीच या प्रसादाची सफलता. ती त्याला लाभेल असा मला विश्वास वाटतो.

**–वि. वा. शिरवाडकर**
*(कुसुमाग्रज)*

५५६८

# प्रसाद-रामायण


१. गीत तुझे गातो ... ९
२. आवाहन ... १०
३. गाती कथा वाल्मिकी मुनी ... ११
४. श्रावणा, सुटला पाही बाण ! ... १३
५. रामजन्म ... १६
६. बाळा जो जो जो रे ! ... १८
७. उजळ झाल्या दिशा, ऊठ बा राघवा ! ... २०
८. ऊठ अहिल्ये, राघव आले ... २१
९. लेक लाडकी--प्रिया जानकी ... २३
१०. सीता स्वयंवरा सजली ... २५
११. श्रीराम निघाले वना ... २७
१२. उर्मिला एकाकी जीविती ... २९
१३. ही पहा लक्ष्मणा, पंचवटी ... ३१
१४. ऊठ जानकी ... ३४
१५. नका ओलांडू ही रेषा ... ३६
१६. बांधिला जटाभार माथा ... ३९
१७. या वाटेने सीतेला नेले ... ४१
१८. शबरीची घ्यावी बोरे ... ४५
१९. दीन दयाघन कोठे ... ४८
२०. सीतेचे स्वप्न ... ४९
२१. श्रीरामांनी सेतु बांधिला ... ५१
२२. लंका सोन्याची जाळिली ! ... ५३
२३. संपले वनवासाचे दिन ... ५६
२४. चला, चला, श्रीरामाच्या करू स्वागता ... ५८

२५. हनुमंत विचारी रामा ... ६१
२६. रामराज्यी सुखी सर्व झाल्या प्रजा ... ६४
२७. सीता निघाली वनासी ... ६५
२८. सती उद्याची वाट चालते ... ६७
२९. परतुनि ये सीते ! ... ६९
३०. उदरि ठाव दे ... ७२
३१. प्रसाद याचना ... ७५
३२. सांगता ... ७७
३३. रामचंद्र गात जा ... ७९

# कवीचे निवेदन

श्रीरामकथा ही भरतखंडात अविरत वाहणारी गंगा आहे. गंगेचे जल जसे अखंड वाहत व सर्वांना पावन करीत चालले आहे तशीच ही रामचरित्राची अद्‌भुत व संजीवक गाथा भारतीय जनतेच्या मनोमंदिरात मानाने विराजमान झाली आहे; व मराठी कवींनी तिचे सदैव प्रेमाने गायन केले आहे. मोरोपंतांनी तर १०८ वेळा रामायणे लिहिली! त्यानंतर आजपावेतो रामायणावर व त्यातील विविध कथा-प्रसंगावर अनेक कवींनी मनोज्ञ रचना केली. रामायण कितीही वेळा गायिले तरी त्याची गोडी अवीट आहे. आपणही ही कथा आपल्या रीतीने गावी अशी माझ्या मनाला प्रेरणा झाली व ही कवितांची माला रामप्रभूच्या कृपेने माझ्या हातून गुंफून झाली.

जीवन भोगताना रामकथेने वेळोवेळी माझ्या मनाला जे आतून अनेकदा सामर्थ्य दिले, जो सात्विक आनंद दिला त्याच्या बळावर रामांचे जीवनचरित्र माझ्या अंतःकरणाला जे भावले ते शब्दात गुंफून मी ही देवकथा गाता झालो. "प्रसाद रामायणात" रामकथेतील भावोत्कट व करुणोदात्त प्रसंगावर रचिलेली तेहतीस गीते समाविष्ट आहेत. कोदंड-धारी रामांच्या तेजस्वी चरित्राइतकीच सीतेच्या करुण-गंभीर व्यक्तिमत्त्वानेही माझ्या मनाला मोहिनी घातली. "शरीराला कष्ट कितीही पडोत, दुःखे कितीही प्राप्त होवोत आणि कोणतीही संकटे येवोत, पण आपल्या दानतीत यत्किंचितही फरक होऊ द्यावयाचा नाही, हा सीतेच्या वर्तनाचा आदर्श आर्यांनी आपल्यापुढे ठेविला आहे. सीता म्हणजे केवळ सौजन्य, शुद्धता आणि पातिव्रत्य यांची जिवंत मूर्तीच! स्त्रीला शोभा देणारे जे जे गुण असावेत असे आपणांस वाटते ते ते सर्व सीतेच्या ठायी होते." असे स्वामी

विवेकानंदांनी म्हटले आहे. त्या सतीच्या मनाचे भावचित्रणही मला वारंवार करावेसे वाटले. "प्रसाद रामायण" हा देवाचा प्रसाद आहे, अशी माझी भावना आहे. रसिकांना याच्या वाचन-श्रवणामुळे काव्यसमाधीचा आनंद लाभावा ही मनीषा. ही प्रार्थना.

ही काव्यकथा रचिताना–देवचरित्राचे धागे गुंफताना वारंवार मन उचंबळून यावे, डोळ्यातील अश्रूंनी लेखणीची वाट आडवावी व भावसमाधीचा लाभ घडावा असे अनेकदा झाले. याने मी व माझी लेखणी आधीच पावन झालो आहो.

ज्यांनी ज्यांनी या काव्यकथेचे मनसोक्त कौतुक केले त्यांना धन्यवाद. ज्यांनी ही गायिली त्या अनेक स्वरसंपन्न गायकांना नमस्कार. आकाशवाणी–पुणे केंद्राने यातील काही गीते रामजन्माच्या पवित्र दिवशी ध्वनिक्षेपित केली त्या केंद्राचे आभार.

चित्रकार श्री. मुळीक, मुद्रणकर्ते श्री. पटवर्धन व प्रकाशक सुहृद, श्री. गो. य. राणे यांच्या सप्रेम सहकार्याबद्दल आभार व धन्यवाद.

कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या समर्थ लेखणीचा पुरस्कार प्रसाद–रामायणास लाभत आहे याचा विशेष आनंद वाटतो. त्यांचे स्नेहऋण मनांत वागवावे.

हे गंगेचे ओंजळभर पाणी रसिक जनतारूपी गंगेला समर्पण असो.

आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् ।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ।।

सोलापूर<br>
२६ जानेवारी १९६७.

वि. म. कुलकर्णी

# १. गीत तुझे गातो

रामा, गीत तुझे गातो --
तव चरिताचे जळ गंगेचे
निशिदिनि त्यात नहातो;
आम्ही, गीत तुझे गातो ।।
संसाराची कथा चालली, चित्ता जागवितो
तव स्मरणाची समइ घरोघर, वात अम्ही सारितो ।।
ही देहाची काडी गंधित, सुगंध दरवळतो
तोच धूप, तो दीप, आरती अश्रूंची म्हणतो ।।
तव विक्रमक्रम वर्णुन आम्ही धन्य जगी होतो
सूर्यचंद्र घेऊनि संगती मधे अम्ही डुलतो ।।
नमिला माथा, उचली आता, राम कृपा करतो
ही विजयाची गाथा गाता, स्वर पुष्पांचा बनतो ।।
धन्य धरित्री, तुझ्या चरित्री, सूर्यदीप जळतो
आमुचे अंगण, झाले पावन; किरण एक मिळतो ।।
आम्ही गीत तुझे गातो ।।



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

# १. आवाहन

रामप्रभूच्या चरित्रगाना
या वाद्यांनो साथ करा,
आता जयजयकार करा ! श्रीराम, श्रीराम !
पूजा येथे श्रीरामाची मांडियली आहे
निजभावाचे स्वस्तिक येथे रेखियले आहे
पंचनद्यांनो, द्या तुमचे जल अमुचा कलश भरा
आता जयजयकार करा ! १

या पुष्पांनो, वसंतातले घेउनिया गंध
पहाटच्या ये वाऱ्या, घेऊन तुझा तरल छंद
चंदन येउन कधीच बसले धरून अमुच्या करा
आता जयजयकार करा ! २

येइ मृदंगा, बोलत धा धिग्, करीत मधुरध्वनी
येई वीणे, लोभसवाणे कंपन घेवोनी !
तार तार झंकार करित ही सतार करिते त्वरा
आता जयजयकार करा ! ३

ये दीपा, ये, निरांजनाची तेववीत वात,
प्रकाश तो फुलवील आमुचे समरसले चित्त,
फुलले हृदयी अमोल काही, तेच वाहतो रघुवीरा
आता जयजयकार करा ! ४

राम, लक्ष्मण, सीता पुढती उभे मूर्तिमंत,
हनुमंताला, प्रिय भक्ताला अभय अर्पितात !
आपण होऊ पुढे आपुल्या जुळवुन इवल्या करा
आता जयजयकार करा ! ५

दीनदयाघन पाहुनि पुढती, करुणेचा स्वामी,
उभी राहिली भावमालिका या अंतर्यामी
पंचप्राणांनो ती वाहुन सूर आगळा धरा !
आता जयजयकार करा ! ६

# ३. गाती कथा वाल्मिकी मुनी

आपल्या भारत देशात सर्वत्र गायिले जाणारे " **रामायण** " हे एक परमपवित्र व पावन महाकाव्य आहे. इक्ष्वाकु कुलामध्ये दशरथाच्या घरी जन्म घेऊन श्रीरामांनी अद्भुत चरित्र करून दाखविले. आदर्श पुत्र, आदर्श पती, आदर्श राजा असा थोर मर्यादापुरुषोत्तम राम होऊन गेला. रावणासारख्या दुष्ट दुर्जनांचा नाश करून संत-सज्जनांना रामाने सुखी केले. त्याची कथा वाल्मीकी मुनी मोठ्या रसाळ वाणीने गाऊन गेले...

श्रीरामांनी कीर्ती केली रघुवंशी जन्मुनी
गाती कथा वाल्मिकी मुनी ॥

एकच सूर्य गगन उजळिते
एक सुपुत्रे वंश उजळितो
सूर्यकुलामधि दीप लावितो–त्रैलोक्याचा धनी,
गाती, कथा वाल्मिकी मुनी ॥ १ ॥

वाट मारितो वाल्या कोळी
नारद आले त्याच्या जवळी
" राम राम " उच्चारुनि जिव्हा झाली वैतरणी
गाती कथा वाल्मिकी मुनी ॥ २ ॥

अज्ञानाचे वारुळ फुटता
ऋषी जन्मला त्यात तत्त्वता
अमर ऋषी तो, अमर कवी तो, रामायण वर्णुनी
गाती कथा वाल्मिकी मुनी ॥ ३ ॥

रामकथेचे अदभुत गायन
भवरोगाचे दिव्य रसायन
तरून गेले कितीक मानव, साक्ष पटावी मनी
गाती कथा वाल्मिकी मुनी ॥ ४ ॥

पुत्र असावा रामावाणी,
पती असावा रामावाणी,

एकच वचनी, सत्यभाषणी, असा न झाला कुणी ......
गाती कथा वाल्मिकी मुनी ॥ ५ ॥

अन्यायाचे तोडित जंगल
जाइल तिकडे केले मंगल
शिळा तारिल्या पाण्यावरती, पुण्याने भारुनी
गाती कथा वाल्मिकी मुनी ॥ ६ ॥

राक्षस वधिले, दशमुख वधिला
भार पृथ्विचा हलका केला
असुरजनांच्या त्रासापासुन सोडविली मेदिनी
गाती कथा वाल्मिकी मुनी ॥ ७ ॥

लोकसंशये सीता त्यजिली
प्रजा सौख्य–वैभवांत सजली
रामराज्य ते झाले गेले एकदाच होउनी
गाती कथा वाल्मिकी मुनी ॥ ८ ॥

बालपणातहि धीर, उदार,
संसारामधि गंगासागर;
गगनछत्र आम्हांस भासला सुखदुःखांच्या क्षणी
गाती कथा वाल्मिकी मुनी ॥ ९ ॥

राम असावा जगी सोयरा,
राम एकला पुरे आसरा,
हेच बोधिती मुनी वाल्मिकी अमृतवाणीतुनी
गाती कथा वाल्मिकी मुनी ॥ १० ॥

पावन गंगा, पावन सागर,
रामकथा त्याहून पुण्यकर !
आम्ही गातो, पवित्र होतो, अंतर-स्वर लावुनी
गाती कथा वाल्मिकी मुनी ॥ ११ ॥

# ४. श्रावणा, सुटला पाही बाण

शरयू नदीच्या तीरावर असलेल्या अयोध्या नगरीत पराक्रमी व धर्मनिष्ठ राजा दशरथ राज्य करीत होता. राज्यात समृद्धी होती. धर्मपालन होत होते. प्रजा सुखी होती. राजाला सर्व सुखात एकच चिंता होती. पोटी पुत्रसंतान नव्हते. राजा मनरंजनासाठी शिकारीला अरण्यात गेला. खांद्यावर माता-पित्यांची कावड घेऊन तो सुपुत्र श्रावण काशीला निघाला होता. तो त्याच अरण्यामध्ये विसाव्याला थांबला होता. अंधाऱ्या रात्री तहानलेल्या आईबापांकरिता पाणी आणावे म्हणून श्रावण जलाशया-कडे निघाला. आणि वृक्षावरून एक अकल्पित बाण सुटला......



श्रावणा, सुटला पाही बाण
सुटला रे बाण ।।
भगिरथवंशी राजा दशरथ
प्रजापालनी दक्ष, सत्यव्रत
पुत्रसुखाविण मानस दुःखित
निघे कराया, काही मृगया,
घोर पाहुनी रान
श्रावणा, सुटला पाही बाण ।।

दिसभर नाही शिकार कसली
अंधाराची येत सावली
तळ्याजवळि वृक्षावर बसली
राजमूर्ति ती; श्वापद येइल,
करावया जलपान !
श्रावणा, सुटला पाही बाण ।।

मायपित्यांची कावड घेउन
निघे काशिला कोणी श्रावण
तहानले ते जल त्यांलागुन–
आणायास्तव, पुत्र निघाला कमंडलू घेऊन
श्रावणा, सुटला पाही बाण ।।

कमंडलू तो जळी बुडविता
'बुडबुड' झाला शब्द अवचिता
बाणहि आला क्षणि सरसरता
'घात जाहला' बोले श्रावण, थरथरले अस्मान
श्रावणा, सुटला पाही बाण ।।

कर्तव्याचे तप आचरिता
असाच येतो घाव अवचिता;
न्याय कसा रचि असा विधाता !
त्याचे देणे, त्याने घेणे, विचित्र हे वरदान !
श्रावणा, सुटला पाही बाण ।।

'हाय, अरे मी मानव वधिला'
दशरथ राजा समीप आला
श्रावण बोले सकंप त्याला–
'तृषार्त माझे माय–तात, द्या जल इतुके नेऊन'
श्रावणा, सुटला पाही बाण ।।

"बोलत का नाहिस रे बाळा
श्रम आम्ही बहु दिधले तुजला"
पाणी त्यांच्या निखळे डोळा
दशरथ त्याते वार्ता कथिता गेला हेलावून
श्रावणा, आला पाही बाण ।।

अंध वृद्ध ते बहु तडफडले
आकांताने अरण्य रडले
शाप बोलती वच शेवटले
आम्हांपरि तू अंती रडशिल, 'पुत्र–पुत्र' म्हणवून
श्रावणा, सुटला पाही बाण ।।

शिकार असली, शापही असला
जगास नाही केव्हा दिसला
शापामधि वर लपून बसला
पुत्रप्राप्ति तरि होइल मजला, सावरि राजा भान
दुःखामधि सुखकण शोधितसे मानव-रीत महान ! ।।

# ५. रामजन्म

राजाने अश्वमेध व पुत्रकामेष्टी हे यज्ञ केले. थोर ऋष्यशृंग मुनींना त्यांसाठी पाचारण केले. वेदमंत्रांचे घोष झाले. दशरथाने मुक्तहस्ताने याचकांना दान दिले. कुणीही अतृप्त राहिला नाही. राजाचे पुण्य सबळ झाले. यज्ञपुरुषाने दिलेले पायस राण्यांना लाभले. पुण्यकाळी त्यांच्या उदरी चार दिव्य बालकांनी जन्म घेतला. चैत्र-मासाची शुद्ध नवमी उगवली. रघुवंशाचा कुलदीपक पाहण्यासाठी सूर्य माध्यान्ही येऊन उभा राहिला. रामप्रभूंचा जन्म झाला. सर्वत्र आनंदीआनंद झाला !

आनंदी–आनंद आनंद ग !
चैत्रमास ऋतु वसंत नवा
नवमीला वंशी लागला दिवा
उधळा कुंकुम, गुलाल रंग
आनंदी–आनंद आनंद ग ! १

कौसल्या राणीचा धन्य कुसवा
सांभाळी त्रैलोक्यपालक जीवा
लाल पालवीचे घडिले अंग !
आनंदी–आनंद आनंद ग ! २

पुत्रकामेष्टी सफळ झाला,
पायस–प्रसाद मिळाला कुळा,
बोलवा सन्माने ऋषि ऋष्यशृंग !
आनंदी–आनंद आनंद ग ! ३

उभवा गुढचा, बांधा तोरण,
रघुवंशाला लाभे भूषण,
झडू द्या नौबती, वाजू दे शिंग
आनंदी–आनंद आनंद ग ! ४

पुनर्वसूचे पहा लक्षण . . .
देवाची पत्रिका वाचील कोण ?
या राजज्योतिषी, पहा पंचांग
आनंदी–आनंद आनंद ग ! ५

नट, नर्तक नाचती रंगी,
गंधर्व गातात शुभ प्रसंगी !
धिमि, धिमि, धिमि, बोले मृदंग
आनंदी–आनंद आनंद ग ! ६

दशरथाचे चित्त प्रसन्न
सहस्र गायींचे करितो दान
अयोध्या नगरी उत्सवी दंग
आनंदी–आनंद आनंद ग ! ७



# ७. उजळ झाल्या दिशा

रामजन्माच्या सुवार्तेमुळे सारी अयोध्यानगरी आनंदित झाली, प्रफुल्लित झाली. राजा, प्रजा, गुरुजन, मुनिजन सारे आनंदित झाले. कौसल्येचा आनंद गगनात मावेना. राजप्रासादात लहानाचा मोठ्या होणाऱ्या बालरामाला ती रामप्रहरी एखादे आनंदगीत गाऊन उठवू लागली म्हणू लागली...‘ऊठ बा राघवा, श्रीहरी माधवा’

उजळ झाल्या दिशा । ऊठ बा राघवा
ऊठ बा राघवा । श्रीहरि, माधवा ॥ १ ॥
रात्रिच्या झुंबरी । तारका जागल्या
या विझू लागल्या । दिवस आला नवा ॥ २ ॥
राजसदनी किती । पक्षिगण बोलती
गाति गुण हे तुझे । तरुनि जाती भवा ॥ ३ ॥
जन्म-जन्मी मनी । रूप जे चिंतिले
तेच साकारले । पाहु द्या राघवा ॥ ४ ॥
पायिंच्या पैंजणा । वाजु द्या रुणझुणा
हातिंच्या कंकणा । बोलवा, जागवा ॥ ५ ॥
नेत्र-कमळातले । तेज पाहावया
प्राण लोभावले । तुज कळे केधवा ? ॥ ६ ॥
आत्मवंशातला । सन्मणी पहायला
सूर्य हा थांबला, । त्यास मुख दाखवा ॥ ७ ॥
घ्यावया उरि तुला । पदर ओलावला
तूच मज पदरि घे । राजसा, गुणार्णवा ॥ ८ ॥
राजसा, उठा उठा । हाति घ्या कांबिटा
कसे वधाल शत्रुला । खेळ मज दाखवा ॥ ९ ॥
न्हाउनी माखुनी । दृष्टबोट लावुनी
लिंबलोण उतरु द्या । माउलीच्या जिवा ॥ १० ॥
उजळ झाल्या दिशा । ऊठ बा राघवा
उठ बा राघवा । श्रीहरि, माधवा ॥ ११ ॥

# ८. ऊठ अहिल्ये, राघव आले



पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे लहानाचे मोठे होणारे राजकुमार धनुर्विद्येत, वेदविद्येत निष्णात झाले. त्यांच्या लीला पाहून दशरथाच्या नेत्रांचे पारणे फिटले......एक दिवस विश्वामित्र ऋषी दशरथाच्या राजसभेत आले. आपल्या यज्ञाला राक्षस विघ्ने आणतात, त्यांचे निवारण करण्यासाठी रामाला व लक्ष्मणाला आपणाबरोबर पाठवावे, असे त्यांनी सांगितले. सोळाव्या वर्षीच दुष्टनिर्दालनाचे रामकार्य सुरू झाले ! त्राटिकेचा वध झाला. राक्षसांचा बीमोड झाला. मिथिला नगरीत होणाऱ्या जनकाच्या यज्ञ सोहळ्यासाठी ते सारे निघाले. मिथिलेजवळ एका जुनाट, रम्य पण निर्जन आश्रमापाशी ते पोहोचले. शापग्रस्त अहिल्या शिळा होऊन तेथे पडली होती. रामाच्या पदस्पर्शाने ती पावन झाली....

ऊठ अहिल्ये, राघव आले
पर्व जीवनी नवे उघडले !

इंद्राने तव हरिले सत्व
लुटिले जीवनसुखसर्वस्व
शापवचन सर्वांगी भिनले
ऊठ अहिल्ये, राघव आले ! १





विकार विजयी झाला तेव्हा
मानवदेही केले देवा,
देवेंद्राचे मनही चळले !
ऊठ अहिल्ये, राघव आले ! २

शापाला उःशाप मिळावा
पापातुन नर वरती यावा
म्हणुनि चालती देवपाउले
ऊठ अहिल्ये, राघव आले ३

त्या चरणांनी शिळा स्पर्शिता
पुनर्जन्म लाभला अवचिता
धूलिकणांचे सुवर्ण झाले
ऊठ अहिल्ये, राघव आले ! ४

मार्ग नवा यापुढे जीवनी
मुक्त अहिल्या शापामधुनी
पश्चात्तापे संचित जळले
ऊठ अहिल्ये, राघव आले ! ५

गळ्यात वनपुष्पांच्या माळा
केशपाश पाठीस मोकळा
तपपूर्तीचे तेज आगळे
ऊठ अहिल्ये, राघव आले ! ६

बद्धांजलि हो रामापुढती
देवदर्शने धन्य सती ती;
गाधिजमुनिचे डोळे भिजले
ऊठ अहिल्ये, राघव आले ! ७

सजीव मूर्ती शिळेत कोरित
देव सर्वदा आहे चालत,
मानवास ना अजुनी कळले
ऊठ अहिल्ये, राघव आले ! ८

# ९. लेक लाडकी, प्रिया जानकी

रामप्रभूंची भावी पत्नी जानकी ही जनक राजाला यज्ञासाठी भूमी नांगरत असताना सापडली. सीतेचे चरित्र जसे अद्‌भुत, तशी तिची जन्मकथाही अद्‌भुत ! धरित्रीची ही कन्या जनक राजाच्या घरी लहानाची मोठी होत होती.

लेक लाडकी, प्रिया जानकी राजाच्या अंगणीं खेळे, खेळे,
कानीचा कुंडल हले हले !

नवीन वयाची नयनज्योती,
गौरवर्ण मुख, आरक्त कांती,
नासिका सुंदर, अधर मधुर, तयात अमृत घोळे, घोळे
कानीचा कुंडल हले हले !

क्षेत्र नांगराया यज्ञाच्यासाठी
सोन्याचा नांगर जनकाहाती
नांगराचा तास, उकरी भूमीस, रत्न हे हातास आले, आले
कानीचा कुंडल हले हले !

यज्ञभूमीतून निघाली सीता
तेजाचा शेला पांघरला होता
कोणा सभाग्याचे, धन पवित्राचे, राजाच्या स्वाधीन केले, केले
कानीचा कुंडल हले हले !

फुलांचा लालिमा, फळांचा गंध,
पाखरांचा स्वर, उदकाचा छंद,
धरित्रीचे धन, हिच्यात साठून, अंगांगी प्रगट झाले झाले
कानीचा कुंडल हले हले !

जनक पिता, जनक माता,
सांभाळी प्रीतीने क्षमेची सुता
समर्थ वीराला, अर्पावी इजला, तरंग मानसी आले आले
कानीचा कुंडल हले हले !

राजसभेसी येऊन बसे
रत्नचुडचाचे तेज विलसे
स्वयंवराची, माळ गुंफण्याची, दैवाची धांदल चाले चाले
कानीचा कुंडल हले हले !

शिवधनुष्याचे खेळणे केले,
भविष्य हातात घेऊन चाले
रूप लक्षुमीचे, पाहून राजाचे नयन कौतुके ओले ओले
कानीचा कुंडल हले हले !

भुलवायाचा आहे रावण,
दुष्टाचे व्हायचे आहे निर्दाळण,
अग्नीची शिखा, वाढते देखा, क्षणाक्षणाला ज्योत प्रबळे
कानीचा कुंडल हले हले !



# १०. सीता स्वयंवरा सजली !

अहिल्येचा उद्धार केल्यानंतर राम, लक्ष्मण व विश्वामित्र मिथिलेला गेले. मिथिला नगरीत जनक राजाने भूमिकन्या सीता हिचे स्वयंवर मांडले होते. शिवधनुष्य लीलेने पेलून श्रीरामांनी त्याचा भंग केला. स्वयंवराची माळ त्यांच्या गळयात पडली. देवदुंदुभी निनादू लागल्या. रामसीतेचा मंगल विवाह झाला, धनुर्धारी रामाच्या जीवनातले विवाहमंगलही एका धनुष्यानेच घडवून आणले !

सीता धनुष्य खेळत आली !!
खेळते वीज गात्रांत, गगनिंची
फडफडे पताका नेत्री, प्रीतिची
वेदकाळच्या ऋषिवर्यांची—प्रतिभा की स्फुरली !
सीता धनुष्य खेळत आली ॥ १ ॥


ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
...६४३१९... ...काव्य...
...१९९०... ...११/३/९१

परशुराम विस्मित झाले, पाहुनि
'पण' नवाच जनका गेले, सांगुनी
श्रीसीतेच्या स्वयंवराची राजसभा जमली
सीता स्वयंवरा सजली ! ॥ २ ॥

"लावील कोण हो दोरी, याजला
वरमाळ जानकी अर्पी, त्याजला"
जनक बोलती, सभा परंतु तटस्थ का बसली ?
सीता स्वयंवरा सजली ! ॥ ३ ॥

ये पुढे दशानन तेव्हा, चालुनी
कोसळे भूवरी धनु ते घेउनी
थरथरली क्षण, हंसे मैथिली, गालींच्या गाली
सीता स्वयंवरा सजली ! ॥ ४ ॥

"रघुवीर उठावे," बोले तैं मुनी
तो धनुर्धरांचा धनिहो, उठला झणी
पदी पदी दावीत चालला सिंहाच्या चाली
सीता स्वयंवरा सजली ! ॥ ५ ॥

शिवधनू कडाडा मोडे—ओढता
त्रिभुवनी नाद तो झाला—गाजता
दोरीसह त्या स्वयंवराची माळ गळा पडली !
सीता स्वयंवरा सजली ! ॥ ६ ॥

सुकुमार गौर बाला ती, ये पुढे
देवाधिदेव प्रभु पाही, तिजकडे
हास्यहार आधींच घालुनी जानकी लाजविली
सीता स्वयंवरा सजली ! ॥ ७ ॥

दाटले अश्रु नयनांत, भूमिच्या
क्षाळिले दिव्य चरणाते, स्वामिच्या
स्वर्गभूमिचे हात मिळाले त्या मंगलकाली !
सीता स्वयंवरा सजली ! ॥ ८ ॥

# ११. श्रीराम निघाले वना

विवाहमंगल आटोपून सर्वजण अयोध्येला परत आले. दशरथाच्या मनात आले, "आता हा राज्यभार श्रीरामाच्या स्वाधीन करावा व आपण मुक्त व्हावे." सभाजनांना हे वृत्त पसंत पडले. राज्याभिषेकाची सर्व सिद्धता झाली. पण कैकयीने विघ्न आणले आणि पित्याच्या वचनपूर्तिसाठी वल्कले पांघरून सत्यवचनी श्रीराम वनवासास निघाले. पतिव्रता सीता व पाठिराखा बंधू लक्ष्मण हेही रामाबरोबर वनाची वाट चालू लागले !

आज श्रीराम निघाले वना
दुःखसागरी बुडे अयोध्या, एका रामाविना ।। धृ. ।।

वचन पित्याने दिधले होते
पूर्ण कराया त्या वचनाते
वृद्ध पित्यास्तव श्रीरामांनी
त्यजिले सिंहासना ! ।। १

निघे संगती बंधु लक्ष्मण
राजसुता जानकी निघे पण,
सूर्यासंगे फिरते छाया,
सोडि न पतिचरणा ।। २ ।।

ऋषी-मुनींना करुनी वंदन
आशीर्वाद तयांचे घेउन
रत्न माणके दान करी तो
प्रभुवर सर्वांना ।। ३ ।।

दुष्ट कैकयी देइ वल्कले
रामप्रभु वल्कलांत नटले
म्हणे जानकी– "कशी वल्कले
नेसू ? शिकवा ना !" ।। ४ ।।

व्याकुळ चित्ती दशरथ राजा
म्हणे, "एकदिन राहुनिया जा,

मूर्ति तुझी साठवून ठेविन,
हृदयींच्या रमणा " ॥ ५ ॥

" निरोप आम्हा द्यावा आता
सांभाळावी अमुची माता–
दुजी प्रार्थना याहुन नाही,
तातांच्या चरणा !" ॥ ६ ॥

" रामा, रामा " फोडित टाहो
दशरथ मागे निघे पहा हो–
धूळ रथाची दिसते तिकडे–
लावितसे लोचना ॥ ७ ॥

रथ थांबव रे थांब सुमंता
म्हणे " पाहु दे माझ्या पुत्रा "
दैवाने जे तुटले, ते तो
सांधू पाही पुन्हा ॥ ८ ॥

–दूर राहिली राजमंदिरे,
दूर माउली, दूर गोपुरे;
सुमंत नेई रथ रामाचा
शरयूतीरांना ॥ ९ ॥

–राजमंदिरी बसे एकली
श्रीरामाची दीन माउली
दोष कुणाचा, दंड कुणाला
म्हणते अश्रूंना ॥१०॥

" चौदा वर्षे वाहिल पाणी
हे नयनांनो घ्या हे ध्यानी
–दैवगतीचे चक्र चालले
खंड तयाला ना
कोठे माझा रामसखा तो ! गेला दंडकवना !" ॥११॥

# १२. ऊर्मिला

ऊर्मिला ही जनकराजाचीच कन्या. रामाचा व सीतेचा विवाह मोठ्या थाटाने झाला, तेव्हा जनकाने आपली ही कन्या ऊर्मिला लक्ष्मणाला दिली. लग्नसोहळा संपून थोडे सुखाचे दिवस तिने पाहिले न पाहिले, तोच श्रीरामप्रभूबरोबर तो आदर्श बंधू लक्ष्मण वल्कले परिधान करून वनवासासाठी निघाला–चौदा वर्षांचा दीर्घ पतिविरह ध्यानात येऊन राजप्रासादाच्या एका बाजूच्या कोपऱ्यात उभी राहून ऊर्मिला आपले अश्रू आवरू लागली––



दुःख मनीचे सांगु कुणाला–कोण मला साथी
ऊर्मिला एकाकी जीविती !

श्रीरामासह नाथ निघाले वनवासासाठी
दुःख उसळले हृदयी माझ्या, कालवले पोटी
या नयनांनी अश्रू वरिले भरल्या एकांती
स्वर विस्मरले, हाती उरली वीणा ही एकटी
ऊर्मिला एकाकी जीविती !

विवाह–मंगल झाले त्याचे स्वर ना मावळले
हळदीचे त्या रंग अजुनि या अंगावर ओले !
वियोग तोवर, योग असे कुणि मम भाळी लिहिले?
माझ्याहुनही बंधूवरची उजवी का प्रीती ?
ऊर्मिला एकाकी जीविती !

स्मराल ना मज नाथा तेथे वनात असताना ?
एवढेच मागणे आपुल्या उदार चरणांना !
तप माझे मी शिकविन येथे माझ्या प्राणांना
सीता वहिनिस सांगा केव्हा–'घरी जाउ धाकटी !'
ऊर्मिला एकाकी जीविती !

जा नाथा जा—विसरु नका पण अयोध्येस कोणी—
वाट पाहते आहे अपुली भुवनाच्या कोनी
कोणी गुंफित आहे दिन दिन माळ आसवांनी
स्मरणाने कुणि मरण जिंकितो, —माझी तीच गती
उर्मिला एकाकी जीविती !

देवकार्य तुम्हि करावयाला जाता हे कळते,
धनुष्यास आयुष्य आपुल्या उदंड मी मागते !
जा, विजयी व्हा, तुम्हा आरती अंतरि ओवाळिते !
मी न तपस्वी, तरि शूराची भार्या भाग्यवती
उर्मिला एकाकी जीविती !

श्रीरामांना भाग्य लाभते वचनपालनाचे,
सीतेलाही पुण्य लाभते थोर सतित्वाचे,
बंधुत्वाची मूर्ती, कीर्ती तुमचीही नाचे
मूर्ति न मी तरि, मूर्तिपुढची होइन हो पणती . . .
उर्मिला एकाकी जीविती !

# १३. ही पहा लक्ष्मणा पंचवटी

रामांनी वनवासाचा कठिण काळ कंठता कंठता अनेक दुष्ट राक्षसांचा नाश केला. जावे तिकडे मंगलाचे राज्य करावे, असे चालले होते. विंध्य पर्वत ओलांडून ते दक्षिणेस आले. अगस्ती मुनींची भेट झाली. त्यांनी सुचविले की, गोदावरीच्या काठी पंचवटीला जाऊन तुम्ही तेथे कालक्रमणा करा...रामांना गोदावरीचा पुण्य परिसर फार आवडला. ते लक्ष्मणाला म्हणाले, "आपण पर्णकुटी बांधून येथेच राहू."...



"ही पहा लक्ष्मणा पंचवटी
या पवित्र गोदेच्या काठी !
विंध्यगिरी हा ओलांडुनिया
आलो आपण दक्षिणेस या
श्रमली, शिणली माझी भार्या

येथे राहुन, चित्त विसावुन, क्रमु या आपण दिनराती
ही पहा लक्ष्मणा पंचवटी ! ...१

रम्य किती हे गोदातीर
फलपुष्पांवर फिरती भ्रमर
चंपक, केतक, अशोक, आम्र
हे हरिचंदन, कदंब पाहुन भ्रमणाऱ्यांचे श्रम हरती
ही पहा लक्ष्मणा पंचवटी ...२

मृग चरताती, मयुर बोलती
हंस जलावर डौले तरती
विहंग गाती वाऱ्यावरती
हा चाफ्याचा, हा कमळांचा, गंध सुगंधित ये भवती
ही पहा लक्ष्मणा पंचवटी ...३

येथे राहू आश्रम बांधुन,
आण शमीच्या शाखा काढुन,
दीर्घ कळक आधारा घेउन
काश, कुशाचे, देवनळाचे पर्णभार घालू वरती "
ही पहा लक्ष्मणा पंचवटी ...४

—तो राजाचा कुमार लक्ष्मण
शोधित फिरला ते दण्डकवनः
क्षणात केले गृह निर्माण !
गोदावरिचे जल थरथरले पाहुनि सुंदर पर्णकुटी !
ही पहा लक्ष्मणा पंचवटी ...५

वास्तुशांति मग करिती राम,
वेदपुरुष तो पूजित होम !
तुष्ट देवता पाहुनि आश्रम
वनांतला संसार चालला, मनात हसतो दाशरथी
ही पहा लक्ष्मणा पंचवटी ! ...६

–पर्णकुटीची पाहुन रचना
राम बोलती बंधु लक्ष्मणा
" देऊ तुज मी काय कळेना,
"आलिंगन घे परितोषास्तव," म्हणुनि घातली गाढ मिठी
ही पहा लक्ष्मणा पंचवटी. ...७

" पिता अम्हाला जरि अंतरला
तूच पित्यापरि होसी मजला
जगास दिससी बंधु धाकला
तू धर्मात्मा, बंधु, सखा रे, जोग घेतला मजसाठी "
ही पहा लक्ष्मणा पंचवटी ! ...८

ऋतूऋतूंचे रंग बदलले
रामधैर्य परि कधि न भंगले
जनस्थान ते मंगल केले
राम, जानकी, लक्ष्मण तेथे सुखात क्रमिती दिनराती
ही पहा लक्ष्मणा पंचवटी ! ...९

# १४. ऊठ जानकी

पंचवटीस राहत असताना राम, सीता, लक्ष्मण यांचे दिवस सुखात चालले होते. मार्गातील संकटे ओलांडीत ते दंडकारण्यात येऊन ठेपले होते. रामाच्या धनुष्याच्या टणत्काराने राक्षस भयभीत झाले होते. ऋषी मुनींचे यज्ञयाग निर्विघ्न चालू लागले होते. वनवासातही सखी जानकीची संगतसोबत असल्याने तो वनवासही सह्य व प्रिय झाला होता. एखाद्या सकाळी गोदावरीचा कलरव ऐकून जागे झालेले राम सीतेला प्रेमाने म्हणत असत—"ऊठ जानकी, साद घालि तुज वनातली कोकिळा"...

रामः

ऊठ जानकी, साद घालि तुज वनातली कोकिळा
ऐक हा पंचम गगनातला !

दिन हेमंताचे प्रिये अता संपले
सुख कणाकणातुन सृष्टीच्या बहरले
हे जंगल धारण करीत कोमल दले
तुजवाचुन पण वनशोभाही खिन्नच दिसते मला
ऐक हा पंचम गगनातला !

ऋतु वसंत आला फुलवित अवघे वन
हा शिरिष मोहरे पुष्पापुष्पातुन !
हा चंपक तप करि श्वेतांबर होउन
करिशिल माळा, म्हणून फुलला वेल जाइचा भला,
ऐक हा पंचम गगनातला !

ही तुझीच हरिणी मूक बाहते तुला,
मृगनयना तूही—स्नेह जुळे आतला
पिंपळ ढाळित पान बोलवित आहे कधिचा तुला
ऐक हा पंचम गगनातला !

गे, आण भरुनिया गोदावरिचे घडे,
जलसिंचन करि या पर्णकुटीच्या पुढे
शुभ स्वस्तिक रेखी, कुंकुम वरि शिंपडे !

नेत्रकमलदल उमलवीत ये, त्यांचा मजला लळा !
ऐक हा पंचम गगनातला !

हे निघू लागले विहंग गगनाकडे
जातील काय हे अयोध्येसही, गडे !
कथितिल कुशल का माझ्या मातेपुढे ! –
" अता सुखाची निद्रा लाभे, माते, तुझिया मुला "
ऐक हा पंचम गगनातला !

हा आश्रम सुंदर राजमंदिराहुन,
मी गृहस्थाश्रमी वनातही राहुन !
तव संगति चाले पूजन, पुण्यार्जन;
तू ज्योती, तू कीर्ती अमुची ध्वजाच की रघुकुळा !
ऐक हा पंचम गगनातला !

ऊठ जानकी, साद घालि तुज वनातली कोकिळा
ऐक हा पंचम गगनातला !

•



# १७. नका ओलांडू ही रेषा

राम पंचवटीस असताना रामाचे कमनीय रूप पाहून मोहित झालेली रावणाची भगिनी शूर्पणखा रामाचे स्वत्व पाहण्यास आली, फजित होऊन परत गेली. तिचा भाऊ खर व त्याचा सेनापती दूषण हे लढण्यास आले असता रामांनी त्यांना यमसदनास पाठविले ! मग लंकेस जाऊन रावणाच्या कानी लागून तिने त्याला जागे केले ! मारीच राक्षसाला 'मायावी रूप घेऊन मजबरोबर चल'––असे म्हणून रावण पंचवटीकडे निघाला...

सीतेला मायावी 'सोन्याचा हरिण' दिसला. सीतेसाठी तो आणावा म्हणून राम निघून गेले. रामबाणाने गतप्राण होता होता मारीचाने मारलेली हाक सीतेच्या कानी आली. लक्ष्मणाला तिने साहाय्यार्थ जाण्यास सांगितले. तो जाताना धनुष्याने रेषा आखून देऊन म्हणाला, "ही रेषा ओलांडू नका."––

चाल : लोकगीताची

नका ओलांडू ही रेषा, सांगे लक्ष्मण
त्याच्या हृदयी शंका–शंका दारुण ।।

राम हरिणाच्या मागे, गेले धावून
मृग सोन्याचा ना कोणी, पाहिला अजून ।।

अशी भुलविते माया, मानवाचे मन
रामराया मोहविला, देव तो असून ।।

अशी लसलस कांति, आगळी देखून
जागे झाले स्त्रीचे मन, सीतेचे मन ।।

आयुष्यात एक हट्ट, बसली धरून
राया मृग सोनियाचा आणावा मारून ।।

माझी कंचुकीची हौस सारील रमण
सीता रूपमती मनीं बसली नटून ! ।।

–निघे राम घेऊनिया धनुष्य नि बाण
सुख कपाळीचे गेला माघारी ठेवून ।।

उद्या माझी सीता मला दिसेल कोठून
असा विचारही नाही स्पर्शला चुकून ।।

चालत्या घडीचे सांगू सांगू वर्तमान
'उद्या सकाळीचे दान' सांगणे कुठून ? ।।

–दूर मृगजळावाणी पळे तो हरीण
राम नवलाई पाही, लावुनी लोचन ।।

शेवटी प्राणांतक एक, सोडियला बाण
राक्षस, मारिच, मेला–मृगत्व टाकून ।।

'धाव लक्ष्मणा धाव' बोले आक्रंदून
स्वर रामासारखाच भेदितो गगन ।।

सीतासती बावरली हादरले मन
म्हणे भावोजींना, जा हो, संकटि धावून ।।

'कसा जाऊ वहिनी तुम्हा–एकटचा सोडून'
सीता ऐकेना बोलली बहुत निंदून ।।

–संकटाची शिळा शिरी घेतसे ओढून
अरे अरे दैवा, तुझी लीला विलक्षण ! ।।

–लक्ष्मण काढी रेषा, पाहुनी निर्वाण,
रेषा नव्हे, नशिबाची दिशा दे आखून ।।

व्हायचे ते झाले अंती नको उच्चारण
याचकाने सतीचेच उचलिले दान ।।

–एक रेषा ओलांडिता, विनाशाचे वन
रेषा सांभाळा सांभाळा, सांगे रामायण ।।

# १६. बांधिला जटाभार माथा

सीता नाहीशी झाल्याचे पाहून रामांनी फार शोक केला ! लतावृक्षांना ते टाहो फोडून "माझी सीता कुठे आहे ?" म्हणून विचारू लागले. लक्ष्मणाने थोडचा विवेकाच्या गोष्टी सांगून त्यांचा शोक आवरला ... प्राप्त जे ते भोगण्यास धनुर्धारी राम सिद्ध झाले...आणि जटाभार बांधून त्यांनी प्रिय धनुष्याचा टणत्कार केला...

त्यजुनि पंचवटि राम निघाले दक्षिणेस आता
बांधिला जटाभार माथा । ध्रु. ।

ज्येष्ठ घनासम श्यामल कान्ती
वीज लोचनी ती झळझळती
रुळति वल्कले अंगावरती
पाठ राखितो पाठीवरच्या भात्यासम भ्राता
बांधिला जटाभार माथा ।

राजस चिन्हे ठायी ठायी
देवच की ते मानवदेही
शोधिति विपिने, वने, गुहाही
कमलपत्रसम नेत्र गाळिती अश्रू नच कळता
बांधिला जटाभार माथा ।

राम बोलती– " काय दैव हे
सत्त्व अजुनि कुणि पाहत आहे
वनवासाचे पर्व सरत ये
कुठे अकल्पित सोडुनि गेली, नेली कुणि सीता ?
बांधिला जटाभार माथा ।

पंचवटी गे, तुझिया अंकी
वनहरिणींची सखी लाडकी
सुखात होती प्रिया जानकी
त्रिभुवन धुंडुन, रिपुबळ रोघुन, शोधुन काढिन मम कान्ता
बांधिला जटाभार माथा ।

हेमन्ताचे दिन ओसरले
सौख्य तयांसह माझे सरले,
सीतेविण जग शून्य जाहले,
सखीवाचुनी सुनी पंचवटि पाहवे न चित्ता
बांधिला जटाभार माथा।

कुठे प्रियेची हाक न येई
लता, वृक्ष कुणि सांगत नाही
ऊठ लक्ष्मणा ! धनुष्य घेई
बळ नच सरले बाहूंमधले, जगास दावू जयगाथा
बांधिला जटाभार माथा।

मृगनयनेचे मित्र हे किती
दक्षिणेस मृग धावु लागती
याच दिशेला असेल ती सती
चल हे बन्धो, माझ्यासाठी माझ्यापाठी ये आता
बांधिला जटाभार माथा।

कथा दिशांनो, कुठे मैथिली,
कुणी अवज्ञा माझी केली
ग्रहगोलांच्या रोधिन चाली
शुष्क करिन मी सागर सारे शोधायास्तव जनकसुता"
बांधिला जटाभार माथा।

—नेत्र लाल ज्वालेसम झाले
जग जाळाया जणू पेटले
गोदावरिचे मन बावरले
सांगे लक्ष्मण प्रभुचा महिमा प्रभुला आवरिता !
बांधिला जटाभार माथा।

पुढे चालले पद बंधूंचे,
बाण पेलिती पराक्रमाचे
खड्‌ग लखलखे एक हातिचे
धनुष्य दाखवि वाट—चालती राघव वनप्रान्ता
बांधिला जटाभार माथा।

# १७. या वाटेने सीतेला नेले

राम व लक्ष्मण हे दोघेही आश्रमात नाहीत ही संधी साधून रावण यतिवेषाने भिक्षा मागण्यासाठी पर्णकुटीपाशी आला व सीतेला रथात घालून लंकेला जाऊ लागला. तेव्हा ती राम-लक्ष्मणांना मोठ्याने आक्रंदन करून हाका मारू लागली. गरुडाचा पुत्र जटायू याने तिचे ते ओरडणे ऐकून सीतेच्या साह्यासाठी धाव घेतली. परस्त्रीचे अपहरण त्या पक्ष्यालाही सहन झाले नाही...त्याने रावणाच्या रथावर झेप घेऊन त्या रथाच्या ध्वजाचा नाश केला...सारथ्याला मारले...रावणाच्या पाठीचे मांसही तोडले...पण रावणाच्या बाणांनी त्याचे पंख छेदले गेल्यावर त्याचा नाइलाज झाला...त्याच्यादेखत सीतेला खांद्यावर घेऊन रावण निघून गेला! मारीचाला मारून परतलेल्या व शोकविव्हल होऊन सीतेचा शोध करणाऱ्या दशरथ-पुत्रांना ती शोककारक घटना जटायूने सांगितली व प्राण सोडला--

जटायू करुणवच बोले । या वाटेने सीतेला नेले
या वाटेने सीतेला नेले ।। ध्रु० ।।

मी होतो वृक्षावरती । तो विलाप आला कानी
घेऊन तुझ्या सीतेला । चालिला दुरात्मा कोणी
भयभीता करि आक्रोश । ती भ्याल्या हरिणीवाणी
वन सारे कंपित झाले । कंपित झाले
या वाटेने सीतेला नेले !

झगडलो झुंजलो देवा । जोवरि या देही प्राण
चंचूने जर्जर केले । कितिवार झेप घेऊन
तोडिले तयाचे बाहू । ते पुन्हा उगवले जाण !
रथ भग्न तयाचा केला । कवचही दिले मोडून
दशकंठ सोडितो बाण । ते येती पंखावरती
बाणांचे घरटे झाले । या माझ्या देहाभवती !
सीतेचे पाहुन अश्रू । संचरली अद्भुत शक्ती
सारथी तयाचा वधिला । मम चंचु हाणुनी माथी
मी खेचर त्याचे वधिले । त्याचे वधिले !
या वाटेने सीतेला नेले !

बोललो ताडुनी त्याला । त्या दुष्ट अधम पाप्याला
" रामाची नेसी भार्या । विष-कुंभच नेसी राया !
चोराचे करिसी कर्म । तू वीर न, असशी अधम
राक्षस-कुल जाइल जळुन । तुज संहारिल श्रीराम " !
—तो पापी क्रोधे भरला । सरसावुनि ये खड्गाला
हे पंख, बरगड्या, पाय । तोडून टाकिले हाय...
रक्ताचे सिंचन चाले । सिंचन चाले
या वाटेने सीतेला नेले !

तव सीता धावत आली । कुरवाळित मजला बसली
ती विलाप करि अनिवार । रावणा निखंदी फार
तो धरू पाहता तीते । वृक्षांना विळखा घाली
' हे रामा ' करी आक्रोश । दुष्टाचा न सुटे पाश !
आकाशमार्गि तो गेला । घेऊन दीन अबलेला
ते पिवळे वस्त्र तियेचे । ते अजून दिसते मजला
ते वदन पुन्हा नच दिसले । पुन्हा नच दिसले
या वाटेने सीतेला नेले !

हे पहा भोवती येथे । हे अलंकार पडलेले
ही तिची नूपुरे पाही । हे कंकण हाती घेई !
हा तिच्या कंठिचा हार । या इथे दिसे सुकुमार
दक्षिणेस रावण गेला । तू जाई त्याच दिशेला
कंठनाळ त्याचे चिरुनी । परतून आण भार्येला
जानकी मिळेलचि तुजला, । हा माझा भोग निराळा !
तो दशरथ माझा मित्र । पुत्रासम गमसी मजला
प्रभु नयन करु नका ओले । करु नका ओले
या वाटेने सीतेला नेले !

तुजसाठि ठेविले प्राण । या माझ्या तुटल्या देही,
घे अंकावरती मजला । शेवटची शय्या देई !
—मग जटायु रांगत आला । श्रीराम जवळि त्या घेई !
तुटलेले दोन्ही पंख । परि आशा तुटली नाही



तुटलेले दोन्ही पाय
परी धैर्य भंगले नाही
रामासी सांगुनि सारे
रक्ताची गुळणी देई !"
"श्रीराम" म्हणत पक्ष्याने
शेवटी सोडिला श्वास
गंगोदक नव्हते तेथे
रामाश्रु मिळाले त्यास !
'रामनाम' अंती गावे
शिकवून जाय जगतास !
'रामनाम' अंती यावे
जरि पुण्य घडे देहास
पाखरू उद्धरुनि गेले
उद्धरुनि गेले
या वाटेने सीतेला नेले
"हा थोर महात्मा गेला
मजसाठि देह अर्पोनी

लक्ष्मणा आण रे काष्ठे "। श्रीराम बोलले वाणी
हरिचंदन, तुलसी, बेल । आणिले तेथ जमवोनि
रामाच्या शुभ हस्तांनी । पक्ष्यास मिळाला अग्नी
दिलि तिलांजली देवांनी । गोदेचे घेउनि पाणी
मानवा मिळाले नाही । ते भाग्य तयाचे पाही
थोरांचे चरित निराळे । चरित निराळे...
या वाटेने सीतेला नेले !



# १८. शबरीची घ्यावी बोरे

जटायूच्या सांगण्यावरून रावणाने सीतेला लंकेकडे नेले हे वृत्त रामांना कळले. पुढे मतंग ऋषींच्या आश्रमाकडे राम गेले. तेथे श्रीरामांच्या आगमनाची वाट पाहणारी शबरी भिल्लीण भेटली. तिचा भावभक्तीचा पाहुणचार घेऊन राम पुढे निघाले. नैवेद्यासाठी तिने आणलेली बोरे अजरामर झाली...

" श्रीरामा सुखधामा रे
शबरीची घ्यावी बोरे
आणिली वनी वेचुनी
मी झाड झाड शोधुनी
पाहिली नीट चाखुनी
ही मधुर अधरि ठेवी रे
शबरीची घ्यावी बोरे १

मज विचारिले वृक्षांनी
येणार कोण कोठोनी ?
तव नाम दिले सांगोनी
ते हसले डुलले सारे
शबरीची घ्यावी बोरे २

या दूर घोर रानात
किती दिवस पाहिली वाट
देहाचे झाले काष्ठ
अजि फुले फुले फुलती रे
शबरीची घ्यावी बोरे ३

झाडिला मार्ग केसांनी
आणिले झऱ्याचे पाणी
शिंपला सडा पक्ष्यांनी
चोचींनी जळ आणुनि रे
शबरीची घ्यावी बोरे ४

या बसा असे सामोरे
हे चरण किती शिणले रे
ते पुसते माझ्या पदरे
एवढा घास हा खा रे
शबरीची घ्यावी बोरे ५

ही धूळ कपाळी राहो
मग देह सुखाने जावो
तुम्हि वाट पुढे चाला हो
जानकी वाट पाही रे"
शबरीची घ्यावी बोरे ६

—कौसल्या चित्ती स्मरली
श्रीराममूर्ति विरघळली,
आसवे गालि ओघळली !
गगनीचे हलले वारे
शबरीची घ्यावी बोरे ७

आलिंगन देई राम
विश्वाचा सुखविश्राम
शबरीचे पुरले काम
ती अजुनि सुगंधित बोरे
आनंद गंध संचारे ८

# १९. दीनदयाघन कोठे ?

सीतेला रावणाने लंकेस नेऊन अशोकवनात ठेविले व ती आपणांस वश व्हावी म्हणून तो यत्न करू लागला. राक्षसींच्या पहाऱ्यात दिवस कंठणारी सीता रामरायाचा मनोमन धावा करू लागली. ज्याच्यासाठी मी स्वखुषीने वनवासही पत्करला, तो माझा प्रेमळ पती–दीनदयाघन राम कोठे आहे–तो मला भेटून माझे दुःखहरण का करीत नाही, या विवंचनेत ती स्वतःशी म्हणू लागली––"माझा दीनदयाघन कोठे––"

सीता–

माझा दीनदयाघन कोठे ?
श्यामल कांति, सुंदर मूर्ती
देव मला कै भेटे ?
मज रात्रंदिन, पडले बंधन
तळमळ चित्ती दाटे
विटंबना ही, जाळित राही–
अंतरि वणवा पेटे
विपरित संचित, तुजविण जीवित
क्षण एक न कंठे !
दे आलिंगन, धावत येउन
गुंतलास रे कोठे ?
म्हणति दयानिधि, सारे तुजप्रति
काय दया ती आटे ?
प्राणविसावा, दिसेल केव्हा
चित्त पुसे नयनांते !
हे प्रिय सदया, हाति धरुनिया
तू मज लावी वाटे !
देह धरणिला, जव न मिळाला
तोवरि ये, ये, भेटे

# २०. सीतेचे स्वप्न . . .

सीतेला त्या वनवासातल्या वनवासात फार मनोदुःख भोगावे लागले——मारुतीने येऊन मुद्रिका दिली व रामांचे कुशल सांगितले. "एक महिन्याच्या अवधीत या बंदीतून माझी मुक्तता करा, नाहीतर मी प्राणत्याग करीन," असा सीतेने निरोप दिला व केसांतील एक मणी खुणेकरिता दिला ! अशा मनःस्थितीत एक दिवस शोकमग्न पण आशेचा किंचित् किनारा दिसू लागलेल्या सीतामाईला एका रात्री स्वप्न पडले...

लंका सोन्याची नगरी । झाली झोपेच्या स्वाधीन
चंद्रकोर अष्टमीची । चाले निरभ्र गगन ! १

अशोकाच्या वनामध्ये । सीतामाई शोक करी
राक्षसींच्या कोलाहली । दिस बोटांनीच सारी २

डोळा लागला सीतेचा । क्षणभर, शिणलेला
अश्रु सुकला गालीचा । जागा राही सोबतीला ! ३

रामप्रभूंचे दर्शन । चित्त नित्य घेत राही
चाळवल्या झोपेमध्ये । भेटावया आले तेही ४

( राम म्हणतात . . . )

" तुझ्यासाठी मारिला मी । आज मृग कांचनाचा
पहा तरी कशी करी । चमचम त्याची त्वचा ! ५

दृढतंतू आणूनिया । याची शिवावी काचोळी
परिधान करिशील । राज्याभिषेकाच्या वेळी ३

सख्या, जावा, कौतुकाने । तुझे पाहतील रूप
नवलाने म्हणतील । कोठे मिळाले अप्रूप ? ७

माझ्यासाठी वनवास । हौसेने तू स्वीकारिला
हौस तुझी ही एवढी । पुरविता हर्ष झाला !" ८

" द्यावे गडे ते इकडे " । सीता करी हात पुढे
जागी झालेली राक्षसी । तोच जोराने हिसडे ! ९

अश्रु सुकला गालीचा । पुन्हा पुन्हा ओला झाला
‘ मला विसरला नाथा ’ ? । स्वर अंतरी उठला १०

‘ मला विसरला रामा ’ । स्वर एवढा उमटे
धरित्रीच्या पोटातून । सागराच्या जळा भेटे ११

सागराची एक लाट । परतीराला पोचली
राजा रामांच्या कानात । स्वरमाला उमटली . . . १२

–रामराय जागे झाले । त्यांनी सेना हाकारली
सूर्य येताना पाहून । चंद्रकोर मावळली ! १३

# ३१. श्रीरामांनी सेतु बांधिला

सीताशोधार्थ निघालेले राम ऋष्यमूक पर्वताकडे व तेथे राहणाऱ्या सुग्रीवाकडे निघाले. किष्किधाकांड सुरू झाले. अन्यायी वालीचा वध झाला. सुग्रीवास त्याचे राज्य रामांनी दिले. महाबळी हनुमंताची भेट झाली. सीताशोधासाठी त्याने समुद्र उल्लंघन करून लंकेत प्रवेश केला...पुढे श्रीराम सर्व वानरसेना घेऊन सागराच्या तीरी आले आणि तो अद्‌भुत सेतू निर्माण झाला...

श्रीरामांनी सेतु बांधिला तरता पाण्यावरी
पाषाणही ते हलके झाले, राम धरुनि अंतरी ।

तीन रात्र दर्भावरि शय्या केली तीरावरी
तरी न सागर झाला जागा, गेला गर्वावरी ।

उभा राहिला राम अखेरी घेउनि कोदंड
बाण चढविला कोदंडाला, कापे ब्रह्मांड ।

" राम एकला करिल काय, हा गर्व तुला झाला
आटवुनी तुज, वाट करिन बघ, आतां लंकेला " ।

थरथरली ती दोरी आणिक थरथरले बाहू
सत्वतेज भिवविते जगाला, चमत्कार पाहू ।

धीट ऐट ती, अंगावरती एक वस्त्र होते
एक धनुष्य नि एक बाण हे तया पुरे होते ! ।

राम गर्जता, जलाधिपति तो, कापत ये वरती
सुखात जावे रामा, पुढती करी तया विनती ।

मिळतिल ते पाषाण आणिले वानर–मित्रांनी
' रामनाम ' त्यावरी लेखिले हलक्या हातांनी ।

' रामचरण आम्हास लाभतिल ', आशा सर्वांना
धरुनी बसले जागा, ती ती, कुणिही सोडी ना ।

पाण्यावरि पाषाण तरावे जरी सत्त्व अंगी,
पहा मानवा, चमत्कार हा, घडला याच जगी ।



९८२५
काव्य

–खार एकली लोळण घेते सागरतीरावरी
कण वाळूचे अंगा जडती त्यांची भरती करी ।

रामप्रभूंनी जवळि घेतले उचलुनि खारीला
पाची बोटे उठति, देह तो सोन्याला झाला ।

जीवन व्हावे सुवर्ण अपुले, रामाच्या कामी
धन्य जीव तो, ज्यास धरि करी, विश्वाचा स्वामी ।

श्रीरामांनी सेतु बांधिला तरता पाण्यावरी
पाषाणहि ते हलके झाले राम धरुनि अंतरी ।



[faint library stamp, illegible]

# २२. लंका सोन्याची जाळिली

सेतु ओलांडून पुढे गेलेल्या लाखो वानरांनी ती लंकापुरी वेढून टाकली. बिभीषणाचा सल्ला न मानता रावण युद्धाला उभा ठाकला. घनघोर युद्ध मातले. लक्ष्मण व इंद्रजिताचे भीषण युद्ध जुंपले. रामरावणाच्या युद्धासारखे युद्ध तर झालेच नाही. देवांना, सज्जनांना बंदीत टाकणाऱ्या उन्मत्त रावणाची सोन्याची लंका रामांनी जिंकली. अगस्ती ऋषींनी मंत्रून दिलेला बाण रावणाचे वक्षस्थळ भेदून गेला.

(चाल कटावाची – धावती)

लंका सोन्याची जाळिली ।
जाळिली, जाळिली, जाळुन प्रक्षाळिली ।
लंका सोन्याची जाळिली ।।

त्रिकुट पर्वताचे ते शिखर, चौबाजूला उसळे सागर
लंका नगरी तेथे सुंदर, श्री लक्ष्मीचे शोभेचे घर !
उंच कोट, तट, वेशी दुर्धर, फलपुष्पांवर भुलले भ्रमर !
अशोक, चंपक, फुलले तरुवर, तिथे नभाला भिडले गोपुर
सात ताल अन् स्तंभ सहस्र, राक्षस रक्षक भवती शंभर !
—त्या प्रासादी राक्षसाधिपति रावण राहे बली
लंका सोन्याची जाळिली ।। १ ।।

प्रचंड सेना घेउनि संगे, राम निघे, हनुमानही निघे
वानर अस्वल निघती वेगे, देवकार्यि कुणि राहि न मागे
अजिक्य राक्षस तिकडे जागे, मानवशक्ति पणास लागे !
जांबुवंत, सुग्रीव, सुलक्षण, महापराक्रमी चाले लक्ष्मण,
—सर्वांपुढती राम धनुर्धर, चाले बलशाली
लंका सोन्याची जाळिली ।। २ ।।

—अंगद शिष्टाईस चालला, राम सांगती संदेशाला:
" ऋषी देवगण छळणाऱ्याला, दंड कराया आलो तुजला,
समुद्र आम्ही ओलांडिला, शरण येउनी घे मुक्तीला
अधर्म पाप्या किति रे केला, दानधर्म करि अंत्य क्षणाला
सीता माझी देई मजला, ना तरि वध तव समीप आला

–पक्षी बनशिल, कोठे लपशिल, तरी न सोडिल राम तुला
–त्रैलोक्यातुनि धुंडुनि मारिन घटका रे भरली"
लंका सोन्याची जाळिली ॥ ३ ॥

अंगद आला तसाच परतुन, गर्वांधाचे मिटले लोचन !
राम निघाले मग सरसावुन, सिंहनाद करि तो वानरगण,
जय रामाचा बोलति गर्जुन–"श्रीराम, जयराम जय जय राम"
"रामप्रभूचा जयजयकार, धनुर्धारिचा जयजयकार"
उंच उंच गोपुरे ढासळुन, विध्वंसाते करिती दारुण
रक्तमांस भूमीस समर्पुन, प्रलय मांडिला तिथे विलक्षण !
धुमश्चक्र युद्धाचे चाले, द्वंदयुद्ध किति ठायी झाले
–अग्निज्वाला, वेढिति सकला, पृथ्वी थरकापली !
लंका सोन्याची जाळिली ॥ ४ ॥

'नागपाश' शत्रूचा काढुन, गरुड वाचवी राम-लक्ष्मण;
मग तेजस्वी दुःसह बाण, निज कोदंडा पणास लावुन
इंद्रजिताला वधितो लक्ष्मण, पुत्र निमाला, भ्याला रावण !
महामेघ ये तैसा चालुन, कुंभकर्ण टाकिलाच तोडुन
गगनि महर्षि पाहति हासुन, निर्मल झाल्या दिशा, उदक पण !
–राक्षसकुल संहार चालला, वसुधा आनंदली
लंका सोन्याची जाळिली ॥ ५ ॥

येई रणांगणि लंकानाथ, दिव्यास्त्रांची घेउनि संगत
क्रोध पेटला त्या नेत्रांत, आठ अश्व ओढितात तो रथ
अपशकुनांनी केले स्वागत, रक्ताचा पाऊस कोसळत
मधून डावा डोळा लवत, तरी बाण रामावरि सोडित
–शक्तिप्रहारे लक्ष्मण मूर्च्छित, रामप्रभूचे मानस दुःखित
विलाप करिती सोडुनिया व्रत–
–"उठ बांधवा मजकडे पहा
तुजविण मजला नकोच जीवित।"
–मग हनुमंते पर्वत आणुन संजीवनि दिधली
लंका सोन्याची जाळिली ॥ ६ ॥

राम गुरूंना स्मरून उठले, प्रलयकाळिचे मेघ भासले
कोदंडाला कुरवाळीले, अपाप तेही टणत्कारले !
तुमुल युद्ध घनघोर उसळले, अंतरिक्ष बाणांनी भरले
सप्तसागरी जळ सळसळले, पाताळातिल जग हादरले.
—मायाव्याने अस्त्र सोडिले, श्रीरामांनी ते परतविले
'भुजंग' शर शेवटी काढिला, ऋचा म्हणुनि अभिमंत्रित केला
सत्वरक्षणासाठि निघाला, आशीर्वाद जगाचा त्याला !
—हृदय रावणाचे भेदुनि शक्ति पुढे गेली—
—रावण वधिला विजय साधिला, राम आमुचा धन्य जाहला—]
देवदुंदुभी गगनि वाजती पुष्पवृष्टि झाली
लंका सोन्याची जाळिली ।
जाळिली जाळिली, जाळुनि प्रक्षाळिली
लंका सोन्याची जाळिली ।। ७ ।।

# २३. संपले वनवासाचे दिन

रावणवधानंतर बिभीषणाला लंकेचे राज्य देऊन राम अयोध्येला परतले. चौदा वर्षे पूर्ण झाली होती. परक्या घरी दीर्घकाल राहावे लागलेल्या सीतामाईने रामासाठी अग्निदिव्य केले. देवांची पुष्पवृष्टी झेलीत सीता रामांसह पुष्पक विमानात बसली ! परमप्रिय श्रीराम गहिवरून म्हणाले--"संपले वनवासाचे दिन !" भूतकाल मागे टाकीत ते दिव्य विमान अयोध्येकडे निघाले....

संपले वनवासाचे दिन,
चल सीते, जायचे अयोध्या नगरीला परतुन ।
राहिले मागुती, दूरच दंडकवन
तव रहिवासाने झाले जे पावन
तो मृग, ती मृगया ते सारे प्रिये रम्यभीषण
संपले वनवासाचे दिन ।। १ ।।

चौदाही वरुषे, धनुष्य खांद्यावरी
चढविला बाण तो पुन्हा न वळला परी !
हटवुनि सागर सेतु बांधिला जमवुनि वानरगण !
संपले वनवासाचे दिन ।। २ ।।

हा स्वतंत्र होता राम सदासर्वदा
तुज परक्या घरिचा बंदिवास, आपदा
अग्नीत क्षाळिली तनू जानकी, तुझेच तप दारुण
संपले वनवासाचे दिन ।। ३ ।।

नकोत आता वनवासाच्या आठवणीही मनी,
ही शरयू आली, जाऊ चल उतरुनी,
घननीळ मला पाहून करिति हे मोर पुन्हा नर्तन
संपले वनवासाचे दिन ।। ४ ।।

ती झळाळणारी पुन्हा बघू गोपुरे
ती असेल तिष्ठत अजून माता बरे
अश्रुजले पद, तिचे धुवोनी, घालू लोटांगण
संपले वनवासाचे दिन ।। ५ ।।

तुडविलेस काटेकुटे जंगलांतुन
तो चरण माझिया अंकावरी घेइन
"सीतापति श्रीराम" म्हणुनि जग करील गुणगायन
संपले वनवासाचे दिन ॥ ६ ॥



# २४. चला चला श्रीरामाच्या करू स्वागता

सारी अयोध्या रामराजाची वाट पाहत होती. आज श्रीराम परत येणार होते. रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून राज्य चालविणारा जटाधारी भरत बंधु-भेटीसाठी उतावीळ झाला होता. कौसल्येचे नेत्र राममूर्तीच्या दर्शनासाठी अधीर झाले होते. श्रीरामाच्या स्वागताला सारे सारे निघाले.

सुखे डोले, अयोध्येची बोले जनता–
" चला चला श्रीरामाच्या करू स्वागता ॥ "

चौदा वर्षे पूर्ण झाली, सरे वनवास
पुष्पक विमान चाले, चाले अयोध्येस;
हनुमंत पुढे आला सांगे सकलास
आनंदाचा, सोनियाचा दिस आला हाता !
चला चला श्रीरामाच्या करू स्वागता ॥ १ ॥

कसे राघवांनी वधिले वनी राक्षसांस,
कसे जनस्थानी केले सुखी सर्वत्रांस,
कैसी शूर्पणखा केली फजीत तत्त्वता
हनुमंत सांगे, कथा ऐक भरता
चला चला श्रीरामाच्या करू स्वागता ।। २ ।।

सुवर्णाची पुष्पे, माळा, गुढ्या घरोघरी
मार्गावरी शिंपडल्या केशराच्या सरी !
गज, अश्व, मोतीयांनी सुशोभित तरी
द्विज वीर चालताती, भाट गाती गाथा
चला चला श्रीरामाच्या करू स्वागता ।। ३ ।।

कौसल्येला, सुमित्रेला हर्ष बहू झाला
शंख दुंदुभींचा नाद गगना भिडला !
कुलस्त्रियानी मंगल कुंभ मिरविला
निघे भरत पुढारा, पादुका त्या माथा
चला चला श्रीरामाच्या करू स्वागता ।। ४ ।।

अंतरिक्षी चंद्र तैसे दिसले विमान
इंद्रापरि राम त्यात भासतो दुरून,
भूमीवरी पाय ठेवी सीतेचा रमण
आलिंगन भरताला देई प्रिय भ्राता
चला चला श्रीरामाच्या करू स्वागता ।। ५ ।।

सती उर्मिला पहाते प्रासादावरोनी
'आले आले परतोनी आमुचेही धनी'
निरांजनातील वात भिजली अश्रूंनी
चौदा वर्षे जागरणाने उजाडले आता !
चला चला श्रीरामाच्या करू स्वागता ।। ६ ।।

" घ्या हो आपुले हे राज्य आपुल्या स्वाधीन
माझा जन्म सार्थ झाला ब्रीद सांभाळून, "
भरताचे ओलावले बोलता लोचन
नेत्र सुखे मिटती देव, भेट ती पहाता
चला चला श्रीरामाच्या करू स्वागता ॥ ७ ॥

केला नगरप्रवेश, मातांना वंदुनी
सीतेसह बैसविले राम सिंहासनी
अभिषेक करिताती वसिष्ठादि मुनी
कौसल्येचा अश्रु झरे कुणा न कळता
चला चला श्रीरामाच्या करू स्वागता ॥ ८ ॥

राम उदार उदार, वाटिताहे धन,
घ्या रे, घ्या रे, सभाग्यांनो पदर भरून
धर्मवत्सल रामांपायी बसे हनुमान
प्रजा अयोध्येची हासे भाग्य ते देखता
चला चला श्रीरामाच्या करू स्वागता ॥ ९ ॥



# २५. हनुमंत विचारी रामा

इक्ष्वाकू कुलातील राजांचा जेथे राज्याभिषेक होत आला, तेथेच वसिष्ठांनी रामाला सिंहासनावर बसवून रत्नांचा किरीट त्याच्या मस्तकावर ठेवला. कोणाला काही, कोणाला काही दाने दिली. सीतेलाही उत्तम हार दिला. सीतेने तो आपल्यावर उपकार करणाऱ्या हनुमंताला दिला. हनुमंत प्रेमाने रामप्रभूंना विचारू लागला-- "तुम्ही काय दिले हो आम्हा ?"

हनुमंत, रामप्रभुभक्त, महागुणवन्त, असा कुणि संत
जाहला नाही
गा कविते गाणे काही !

वनवासपर्व हो सरले । प्रभु राम घरासी आले
ते वसिष्ठ दुसरे तात । राज्याभिषेक करतात
तातडी केलि या वेळी । कौसल्या मनि भ्यालेली !

रत्नांचा माथा मुकुट । चामरे बंधु धरतात
सिंहासनि बसले राम । आप्तांचे पुरवित काम
ब्राह्मणा दिले बहु दान । अंगदा बाहुभूषण
सीतेला दिधला हार । नवरत्नांचा सुकुमार......
–काढिला हार सीतेने । प्रेमाने, वात्सल्याने
पाहिले तिने हनुमंता । तो जवळि महात्मा होता
" मजसाठी झाले कष्ट । हे घ्यावे वानरश्रेष्ठ । "
तो हार दिला हनुमंता । आल्हादित सारी जनता
–तो हार घालुनी कंठी । रामदूत बघतो भोती
रत्नांनी नटली छाती । अश्रूंचे त्यावर मोती !
देवांची झाली दाटी । ते दृश्य पाहण्यासाठी
तो धन्य राम गुणधाम, धन्य बलभीम, धन्य ती सती
सती सीताही
गा कविते गाणे काही !

हनुमंत विचारी रामा । " तुम्हि काय दिले हो आम्हा ?
सुग्रीवा दिधले राज्य । त्याचेही पुरले काज
बिभिषणास दिधली लंका । सेवकाकडे या देखा—"
–देवाचे सारे भक्त । लाडका त्यात हनुमंत
श्रीराम सांगती त्यास । आसवे नेत्रि साक्षीस :
" मारुती, गड्या तू मित्र । हा जसा बंधु सौमित्र ।
तू समुद्र उल्लंघीला । मुद्रिका दिली सीतेला
रावणास केले त्राही । बलभीम खरा तू पाही
द्रोणागिरि तू आणून । लक्ष्मणास दिधले प्राण
तू माझा दुसरा प्राण । तुज काय देउ रे दान ?
–अम्हि जाता निजधामाते । सांभाळी संतजनाते ।
–धर्माची राखा कीर्ती । दुबळ्यांना द्यावी स्फूर्ती
–हे कार्य दिले तुम्हांला । व्हा चिरंजीव जगताला ।
रामायण चाले जेथे । तुम्हि उभे राहावे तेथे । "

ऐकून रामवचनाला । सुत अंजनिचा गहिवरला ॥
मी वानर पामर तरिही । दिली थोरपणाची ग्वाही
हे ध्यानि येता हसला । सुत अंजनिचा गहिवरला ॥
प्रभुचरण, संतजनस्मरण, ठेविले धरुन, अश्रु पाझरुन
नयनजल वाही
गा कविते गाणे काही !

# २६. रामराज्यी सुखी सर्व झाल्या प्रजा

रामांनी अयोध्येत न्यायाने राज्य केले. सर्व प्रजा फार सुखी झाली ! सर्वच सूर्यवंशी राजे प्रजावत्सल होते. पण रामराज्यात काही आगळेच सुखसमाधान लोकांना लाभले.

रामराज्यी सुखी सर्व झाल्या प्रजा
तोषल्या देवता, तोषली सारजा ॥ १ ॥

–मेघ प्रथ्वीप्रति, समयि जल वर्षती
नदनद्या वाहती–लोककाजा ! ॥ २ ॥

–सकळ धनधान्यही, देत राही मही
तिज तरी जावई, रामराजा ॥ ३ ॥

–वृक्ष ढाळिति फुले, गगन गंधावले
प्रेमसुख भोगते ती प्रजा, आत्मजा ॥ ४ ॥

–लोभ नाही मनी, क्षोभ नाही जनी
चोर नाही कुणी, चोरणारा खुजा ॥ ५ ॥

–राम सांभाळितो, लोकप्रतिपाळ तो
बाळही बोलतो, " राम माझा " ॥ ६ ॥

–खूप लढले धनु, घेइ विश्रांतिला
बाण भात्यातला, विसरुनी त्यास जा ॥ ७ ॥

–यज्ञ चाले कुठे, मंत्र ऐकाच ते–
त्याग अन भोगही, मिळवितात‍ी भुजा ॥ ८ ॥

–न्याय संतुष्टला, सत्वगुण वाढला
धर्म तो लोभला, रामराज्या ॥ ९ ॥

–याचकांच्याविना, दान द्यावे कुणा ?
सर्व सुखी सर्वमुखी, मंगलाच्या ऋचा ॥ १० ॥

–उदक गंगेतले, चहुदिशी वाहिले,
देवगण धावले, भूवरी यावया ॥ ११ ॥

## २७. सीता निघाली वनासी—

रामराज्य सुखाने चालले असता पुन्हा दैवगतीचा फेरा फिरला ! लोकपालन हेच आपले ब्रीद समजणाऱ्या त्या थोर राजाने सीतेविषयी कोणी यत्किंचित संशय घेतो हे पाहून तिचा त्याग करावयाचे ठरविले. गर्भवती असलेल्या सीतेचा कठोर अंत:करणाने रामराजाने त्याग केला. सीतेला गंगापार करून वाल्मिकीमुनींच्या आश्रमापाशी सोडून देण्याची कामगिरी रामांनी लक्ष्मणावर सोपविली...सारा संसार मागे सोडून सीतामाई वनाला निघाली.

उभा लक्ष्मण दीर । म्हणे 'चला,' वहिनीसी
सारा संसार सोडून, सीता निघाली वनासी ।। १ ।।

कोणी म्हणे सीताबाई, 'चालली का माहेराला'
तिची जननी धरित्री, जेथे तेथे भेटे तिला ।। २ ।।

रघुवंशाचा अंकुर माउलीच्या उदरात
वेडया दैवाने बांधिले दु:ख तिच्या पदरात ।। ३ ।।

म्हणे लक्षुमणा दीरा, 'रान दिसते अफाट
सांगा सांगा हो भाऊजी, कुठे निघाली ही वाट?' ।। ४ ।।

—लक्ष्मण दीर तरी, मुख फिरवी माघारी
डोळयांतल्या पाण्यामध्ये त्याची विरली वैखरी ।। ५ ।।

—राम सांगताहे दु:ख नेत्रांतल्या अश्रुपाशी
'सीतेवाचूनिया आता, राम सदा वनवासी' ।। ६ ।।

सीता निघाली वनासी, वन दिसे भयकारी
एका एका पावलाला, 'राम' जपते अंतरी ।। ७ ।।

सीता म्हणते मनात, "पुन्हा कशाला हे वन—
उगाचच वल्कलांची, झाली पुन्हा आठवण ! ।। ८ ।।

— राजा रामाच्या संगती, वनवास सुखी झाला
लंकापती रावणाचा, माझ्यासाठी वध केला ।। ९ ।।

माझ्या कंचुकीच्यासाठी, मृग सोन्याचा मारिला
हौस राहिली अपुरी, दुःख भोग नशिबाला ।। १० ।।

डोळे भरुनिया नाही, राम
येताना पाहिला
आता येईन का कधी, पुन्हा
माझ्या अयोध्येला" ।।११।।

पुन्हा नाही परतली, सीता
कधी अयोध्येला
दैव हसते मनात, 'चल'
म्हणते सतीला ।। १२ ।।



# २८. सती उद्याची वाट चालते !

दुसऱ्यांदा वनवास भोगणारी सती सीता वाल्मिकींच्या आश्रमात मोठ्या धीराने पोटीच्या पुत्रसंतानांना लहानाचे मोठे करू लागली. तिचे सारे सत्व या वेळी आणखी पणाला लागले. एकाकी झालेली ती अबला मातेचे पुण्यकर्तव्य पार पाडताना पुन्हा सबला झाली ! स्त्रीजीवनात एकटीला वाट चालण्याचे दिव्य केव्हा केव्हा कसे करावे लागते, हे त्या तेजस्विनीने दाखवून दिले...

कटिखांद्याशी घेउनि बाळे, सती उद्याची वाट चालते
वाट चालते, वाट चालते ।। ध्रु. ।।
दैवी लिहिले काय कळेना,
पुन्हा पुन्हा वनवास, वंचना,
तरि न त्यागिला स्वतंत्र बाणा
प्राणपणाने आत्मबलाच्या – रघुवंशाच्या ज्योती जपते
वाट चालते, वाट चालते ।। १ ।।

वाट चुकविली जरि दैवाने
तरी न भ्याली कधी मनाने
दिव्य दिनंदिन केले सतिने
रघुरायास्तव रानफुलांचा हार रोजला एक गुंफिते
वाट चालते, वाट चालते ।। २ ।।

सीता आता बनली माता
वनात हसते पुत्रांकरिता,
धनुष्य शिकवी स्वतः ओढिता
सिंहशावकासम ते बालक – धन भाग्याचे सांभाळीते
वाट चालते, वाट चालते ।। ३ ।।

कधी स्मरण हो रघुवीरांचे
सिंहासनही दिसे प्रभूचे
वंदन चाले मनि चरणांचे
घ्या सिंहासनि तुमच्या बाळा, या कुरवाळा, तयास म्हणते;
वाट चालते, वाट चालते ।। ४ ।।

" तुम्हि बाळांनो, क्षत्रियवंशी
नाते तुमचे रघुवंशाशी
दंड करावा अन्यायासी
बाण आपुले प्राण मानणे – धनुष्यास मी दोरि लाविते
वाट चालते, वाट चालते ॥ ५ ॥

रघुरायांना पहाल जेव्हा
निजबाणांचे तेज दाखवा
नाव आइचे सांगा तेव्हा
दुरून पाहिन डोळे भरुनी, आशा मनिची मला सांगते "
वाट चालते, वाट चालते ॥ ६ ॥

मुनी वाल्मिकी कौतुक बघती
मान वळवुनी लोचन पुसती
कवनि सतीचे चरित्र गाती
नयनामधले उदक तयांच्या तेजस्विनिचे पुण्य सिंचिते !
वाट चालते, वाट चालते ॥ ७ ॥

# २९. परतुनि ये सीते

लोकानुरंजनासाठी आपण सीतेचा त्याग केला. ती खरोखर पवित्र आहे, शुद्ध आहे, हे शल्य श्रीरामांना मनीमानसी बोचत राहिले. तो सत्त्वधीर राजा प्रजापालन करीत होता. प्रजा सुखी होती. पण राम सुखी नव्हते. अंतःकरणातून ते सीतेला आठवीत होते. ती कधी परत येणार नाही, हे माहीत असूनही 'परतुनि ये सीते' असे मनाशी म्हणत होते...

ये प्रिये, येइगे सदये,
परतुनि ये, सीते !
तुजविण राज्ञी, अर्धे माझे सिंहासन हे रिते !
परतुनि ये सीते ॥ ध्रु. ॥

निष्ठुर हा श्रीराम म्हणवुनी
रुसलिस का दयिते,
कुणा न भ्याले मानस माझे
आता थरथरते
परतुनि ये सीते ॥ १ ॥

मजसाठी नेसलिस वल्कले,
कोमल तव काया
वनवासामधि निर्दय कंटक
रुतले तव पाया
कधी न फिरले पाउल मागे
निघे पतीपुढते !
परतुनि ये सीते ॥ २ ॥

लोकसंशये त्यजिले तुजला
तुजला नच कळता,
पती म्हणुनि मी किती ग दुबळा
कळते मज आता !

आग आतली कशी जगाला
दावावी ललिते ?
परतुनि ये सीते ॥ ३ ॥

प्रेम तुजवरी किती विचारी
वनिच्या वृक्षांना,
मम हाकांनी अश्रू फुटले
तेव्हा पाषाणा
प्रियकर तो अजि ' राजा ' झाला
कर्तव्यचि छळते--
परतुनि ये सीते ॥ ४ ॥

पुत्र-आपुले लव कुश दोघे
हे माझ्यापुढती,
माय-कौतुकासाठी त्यांचे
लोचन पाणावती
येइ एकदा नभांतरी तरि
बालांच्या माते
प्रेमळे, परतुनि ये सीते ॥ ५ ॥

काय नेमिले ' लग्न ' व्हावया
अशि ताटातूट,
कशी एकट्या श्रीरामाने चालावी वाट ?
विधिलीला कशि सहन करावी
दावी विश्वाते
परतुनि ये सीते ॥ ६ ॥

पुढील जन्मी नव अवतारी
सुखविन मी तूते
हे आश्वासन श्वास देति तुज
विचार वाऱ्याते !

राम जिथे सीताहि तिथे
हे शरिर सरो परते
परतुनि ये सीते ॥ ७ ॥

गौरवर्ण मुख ते, ती कान्ती,
पाहिन मी केव्हा ?
त्या नयनींच्या प्रेमळ ज्योती
दिसतिल का केव्हा ?
ते पुण्याचे वलय कधी का
फिरेल मजभवते ?
—परतुनि ये सीते ॥ ८ ॥

# ३०. उदरि ठाव दे !

वाल्मिकी ऋषींच्या आश्रमात रघुवंशाचे दोन दीप तेजाने व कांतीने वृद्धिंगत होत होते. वाल्मिकींनी त्यांना स्वतः रचिलेल्या रामायणातील कथाभाग म्हणावयास शिकविले. ती मुले मोठ्या मधुर आवाजांत आपल्या पित्याचे अद्‌भुत चरित्र गात असत, तेव्हा ऐकणारे गहिवरून जात...ते धनुर्विद्येतही पारंगत झाले होते...रूपाने व अंगलटीने हुबेहूब रामासारखे दिसणारे ते राजकुमार पाहून सीतेचे मन प्रेमकरुणेने उचंबळून येई !

अयोध्येतील अश्वमेध यज्ञासाठी वाल्मिकींना बोलावणे आले. ते बरोबर लवकुशांना घेऊन गेले. त्यांनी गायिलेले "रामायण" ऐकून रामप्रभू गहिवरले. आपल्या आवाजासारखा आवाज ऐकून व आपल्यासारखेच रूप समोर पाहून ते चकित झाले ! ती त्यांचीच बाळे होती हे समजल्यावर त्यांनी सीतेला बोलावणे पाठवले. आपल्या वनवासातील आचरणाबद्दल पुन्हा लोकसंशयाची निवृत्ती सीतेने केली तर आपण तिचा स्वीकार करू, असे लोकनायक राम म्हणाले !

——सीता राजसभेत आली. पतीच्या सिंहासनासमोर उभी राहिली. एकवार भरल्या डोळयांनी तिने पतिचरणांचे दर्शन घेतले. सारा जीवनपट डोळयांपुढून सरकला. ते जनकाघरचे बालपण, ते स्वयंवर, ते विवाहमंगल, ते एकनिष्ठेने केलेले वल्कलधारण, ती पंचवटी, तो सुवर्णमृग, ते अशोकवनातील पुण्याचरण——सारे अश्रूंच्या साक्षीने डोळयांपुढून गेले. दोन्ही बाळांना कुशीस घेऊन भगवे वस्त्र धारण केलेली सीतामाई भरसभेत उच्च स्वरांत शेवटचे शब्द बोलली——"माझ्या हातून शरीराने, शब्दाने किंवा मनाने वाईट कृत्य घडले नसेल तर ही धरणीमाता मला पोटात घेवो." जेथे सीतेचे अश्रु सांडले होते तेथे धरणीमातेचा ऊर दुभंगला आणि ती महासती, प्रेममयी, करुणामूर्ती सीता पृथ्वीच्या पोटात गडप झाली. एक महान जीवनयज्ञ समाप्त झाला. धरणीमातेला सीता म्हणत होती.——

सीता :

उदरि ठाव दे, मला जवळि घे, तुजला विनवीते
हे धरणीमाते ! ध्रु.
चौदा वर्षे या देहाची गेली वनवासी
मानस माझे शुद्ध, राहिला अग्नी साक्षीसी
ढग दुःखाचे पुनश्च जमले निर्मल आकाशी !
सिंहासन उतरुन चालले पुन्हा आश्रमाते
हे धरणीमाते ! १

काय निवाडा केला देवा मज कळले नाही !
अपवादाचा कलंक पुसला, दिली पुन्हा ग्वाही !
लोकाराधन करावयाची इतुकी का घाई ?
पतिकीर्ती गाजली – जाहले तप माझे पुरते
हे धरणीमाते ! २

वाढविले हे पुत्र वनामधि – नवसाने झाले;
ज्याचे धन हे त्याच्या स्वाधिन आनंदे केले
सुफलित झाले माझे जीवित, नाथांना पाहिले
पुन्हा परीक्षा नकोच आता, चित्त आवरीते,
हे धरणीमाते ! ३

अश्वमेध जाहला नगरीला, हे मजला कळले
सुवर्णमूर्ती बनून जवळी होते ना बसले !
आश्रमवासी पुत्र घेउनी वाल्मिकिही आले !
पुत्र कथा गातात पित्याची – सभा सकळ ऐकते
हे धरणीमाते ! ४

–भगवे धारण करून आले मी आता पुढती
शेवटचे हे दिव्य कराया राजसभेपुढती !
पवित्र जरि हा देह मला घे, घे अंकावरती
नाथासम मम शूर पुत्र हे पुन्हा बघुन घेते
हे धरणीमाते ! ५

ऋषी वाल्मिकी तुम्हास वंदन करिते ही सीता
तुम्ही लळा लाविला, घातला पालव मम माथा
हालविला तुम्हि वनी पाळणा मम बाळांकरिता
घ्या पोटाशी पुन्हा एकदा तुमच्या लेकीते
हे धरणीमाते ! ६

जन्मभरी माहेर मिळाले नाही सीतेला
कधी अवस तर कधी पूर्णिमा लिहिली मम भाळा

या देहाचा, या जन्माचा
अता शीण आला !
तुझ्यावीण ही लेक उदासिन –
घाली पदराते
हे धरणीमाते ! ७

या जागेवर मम बाळांची
वाढू दे कीर्ती,
या जागेवर फुलोत सुमने
रामांच्यासाठी,
या जागेवर धूळ उधळुं दे,
पदे चालता ती
दुभंग होई माते आता,
मी जवळी येते
हे धरणीमाते ! ८



# ३१. प्रसादयाचना

वीरपुरुषाचे जीवन लोकगंगेला वाहिलेले असते, हे रामांनी दाखवून दिले त्यांच्या पुण्यपावन चरित्ररूपी भागीरथीत सुस्नात होऊन असंख्य भाविकांची मने पावन झाली. इहलोकीच त्या त्या जीवांना कृतार्थता लाभली. रामांनी जनउद्धाराचे व जीव उद्धाराचे कार्य आपल्या लोकोत्तर चरित्रात केले--चरित्रानंतरही ते कार्य चालू आहे! म्हणून आम्ही वारंवार **रामायण** गातो. पवित्र बनतो. वेडेवाकुडे गाऊन त्याच प्रभुचरणांशी प्रसादयाचना करतो.

[ श्लोक ]

रघुकुलटिळकाने दाविली देवलीला,
बळ यशगुण गाया लाभु दे लेखणीला,
निशिदिनि प्रभु ध्यानी राम व्हावे मनाने,
सफळ जनन माझे गीत गाता मुखाने ।। १ ।।

बहुजन भवदुःखी राम चिन्तून गेले
मम मन प्रभुपायी आज गुंतून ठेले
इहपर—सुखदाता राम त्राता स्मरून
हसत हसत जावा देह लोकी सरून ।। २ ।।

लवकुश पहिल्याने गीत गाऊन गेले
चरित निज पित्याचे त्याजला ऐकवीले
निजसुत गुण गाता धन्य झाला पिता तो
ममहि कवन आता ऐकितो काय हो तो ? ।। ३ ।।

माझी भाषा राजभाषा मराठी,
माझ्या देशी पाउले चालली ती !
येथे झाले दास ते रामदास . . .
त्यांचा आम्हां वारसा सज्जनास ।। ४ ।।

तुलसीदासाते मनी आठवीतो
भावार्थाच्या एकनाथा नमीतो

श्रीरामाचे गीत गाऊन गेले
ते ते लोकी धन्य सद्‌वंद्य झाले ॥ ५ ॥

अयोध्येच्या राजसिंहासनीचा
राजा झाला, वर्णिते कीर्ति वाचा,
त्याने त्याचा ऐकुनी काव्यबंध
आम्हां द्यावा धाडुनीया **प्रसाद** ॥ ६ ॥

गंगानदीचे मज स्नान झाले
तीर्थास हे जाउनि चित्त आले
रामायणाचे नवगान केले
निवान्त नीरांजन अर्पियेले ॥ ७ ॥

वाणी तरी पावन ही जहाली
ही लेखणी धन्य कृतार्थ झाली
आता हिला रामपायी समर्पू
हा देहही त्या चरणांस अर्पू ॥ ८ ॥



# ३१. सांगता

रामचरित्राचे गायन करील तो तो पवित्र होईल. रामकथा ऐकेल ते ते मन अंतर्बाह्य प्रक्षाळून निघेल. रामकथेची सांगता तरी कशी वर्णावी ? त्यांचा कृपा-प्रसाद पदरात बांधावा आणि पुन्हा पुन्हा मनाने, वाणीने त्यांचे गुण आठवावे. त्यांचे रूप ध्यानी आणावे. त्यांच्या चरणी लीन व्हावे, पापमळ धुऊन जाऊन आमची मने पवित्र व्हावी. दुष्टांना दंडण्याचे धैर्य आम्हांला लाभावे. रामराज्याप्रमाणे सर्व सुखी व्हावे. सर्वांचे कल्याण व्हावे, हीच श्रीरामायणाची सांगता म्हणावी.

राम बैसले सिंहासनी
तेचि आमुच्या मनीध्यानी
तयांनी प्रेरणा करुनी
काव्यप्रसाद दिधला ।। १ ।।

राजा म्हणजे प्रजारंजक,
त्याचे चरित्र स्फूर्तिदायक
श्रोतया गायका व्हावे सुख
'**प्रसाद-रामायण**' सेवनी ।। २ ।।

लक्ष्मणासारिखा भ्राता
जानकीसारखी कांता
सेवक तरी हनुमंता–
सारिखा लोकी मिळावा ।। ३ ।।

हरिश्चंद्रासारिखे कुळ
वशिष्ठाऐसा गुरु सबळ;
चौदा वर्षे पादुका-सांभाळ
भरत बंधु असावा ।। ४ ।।

रामासारिखा झाला राम
त्याग-सत्त्वाचा संगम
पाठी-पोटी करुण परम
राम आम्हां असावा ।। ५ ।।

संसारशत्रूचे नाही भय
त्याच्या शिरी देऊ पाय !
आम्हां पाठीशी सदय
रामसखा असावा ।। ६ ।।

संसार सुखदु:खांचा मेळा
कैसा साधावा अवलीळा,
कर्तव्य मेळवी पुण्यबळा
हे रामांनी शिकविले ।। ७ ।।

अन्याय तरी दंडावा
दुष्ट दुर्जन खंडावा
स्वानंदाची गुढी उभवा
हे रामांनी शिकविले ।। ८ ।।

सत्याचाच होतो जय
असत्य पावे पराजय
लोकपालनी दावावा नय
हे रामांनी शिकविले ।। ९ ।।

अंगी असावा पराक्रम
निर्भय वाणी मनोरम
नयनीं तेजाचा विभ्रम
हे रामांनी शिकविले ।। १० ।।

'राम' निजांतरि जागवा
हाच आमुचा सांगावा
आमुचा रामराम घ्यावा
आतां रामायण संपले ।। ११ ।।

## ३३. रामचन्द्र गात जा . . .

रामचंद्र रामचंद्र, रामचन्द्र गात जा
हे मना सज्जना अमृतात न्हात जा... ध्रु.

सकल-मंगल-निधी तो गड्या दयानिधी
तो कृपाळ लोकपाळ त्यास आळवीत जा... १

रामचरितमानस सौख्य देइ सज्जनास
तू बनून राजहंस मुक्तचित्त होत जा २

संकटात, संभ्रमात रामनाम अंतरात
पैलपार पाववील नाव वल्हवीत जा ! ३

मावळेल अंधकार दशदिशा प्रकाशणार
सूर्योदय होइल, तू अर्घ्य मात्र देत जा ! ४

१६२९

# समाप्ति

– माझा पिता ‘ महादेव ’
मायमाउली ‘ उमा ’ सदैव
कुलकर्णीपणाचे आडनाव
आम्ही नावास जोडितो

– स्वनाम तरी ‘ विनायक ’
विघ्नहर्ता हो आंगिक
तत्कृपेने निर्विघ्न देख
ग्रंथ आम्ही संपविला ॥

– शके अठराशे अठ्यांशीस
मास तरी पुरुषोत्तम मास
तेधवा मर्यादा–पुरुषोत्तमास
आम्ही कवनी वंदिले– ॥

श्रीरामचंद्रार्पणमस्तु ।

REFBK-0016289
REFBK-0016289



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
168368 काव्य
१९९० 22/3/69)